लोकमत



परदेशांतील विद्यापीठांत पीएच.डी. करण्यासाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांचा कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सत्कार केला. यावेळी शेजारी डॉ. किरणकुमार शर्मा, प्रमोद कसबे, आदी उपस्थित होते.

# 'नॅनोसायन्स'चे आठ जण करणार परदेशांत पीएच.डी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी येथील सात विद्यार्थ्यांची दक्षिण कोरियामधील, तर एकाची जपानमधील विद्यापीठामध्ये पीएच.डी.चे संशोधन करण्यासाठी निवड झाली आहे.

शरद माने (कोळोली, कोल्हापूर) यांची जपानमधील ओसाका विद्यापीठामध्ये, जिनेश चौहान (कोल्हापूर) यांची कोरिया विद्यापीठ, सेऊल, धनंजय दत्तात्रय कुंभार (सुळगाव, बेळगाव) यांची ग्योंगसांग राष्ट्रीय विद्यापीठ, जिंजू, ओमकार पवार (कोल्हापूर), ज्ञानेश्वर घाटगे (चिंचवाड) यांची जीऑनबुक राष्ट्रीय विद्यापीठ, सेऊल, पवन कोडम (सोलापूर) यांची चोन्नम राष्ट्रीय विद्यापीठ, योंगबोंग, चंद्रशेखर पाटील (रा. कुरणी) यांची जेजू राष्ट्रीय विद्यापीठ, जेजू आणि योगेश दादासो डांगे (आष्टा, सांगली) यांची गॅचोन विद्यापीठ, सेओंगनाम, दक्षिण कोरिया येथे विद्यावेतनासह निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांनी बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचा पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी अभिनंदन केले

जनसंपर्क कक्ष
25 AUG 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आठ विद्यार्थी करणार परदेशात पीएच.डी.

## दक्षिण कोरिया आणि जपानमधील प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथील सात विद्यार्थ्यांची दक्षिण कोरियामधील, तर एकाची जपानमधील प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये पीएच.डी.चे संशोधन करण्यासाठी निवड झाली आहे.

कुलगुरू दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव विलास शिंदे यांच्यासह नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी त्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**कोल्हापूर : नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व इतर.**

निवड झालेल्यामध्ये शरद सुनील माने यांची जपानमधील ओसाका विद्यापीठ (जागतिक क्रमवारी ६८) येथे निवड झाली आहे. जिनेश ललितकुमार चौहान यांची कोरिया विद्यापीठ, सेऊल (जागतिक क्रमवारी ७४), धनंजय दत्तात्रय कुंभार यांची ग्योंगसांग राष्ट्रीय विद्यापीठ, जिंजू (जागतिक क्रमवारी ३०१), ओमकार येल्लोसा पवार आणि ज्ञानेश्वर हिंदुराव घाटगे यांची जीऑनबुक राष्ट्रीय विद्यापीठ, सेऊल (जागतिक क्रमवारी ५५१), पवन मल्लेश्याम कोडम यांची चोन्नम राष्ट्रीय विद्यापीठ, योंगबोंग (जागतिक क्रमवारी ७५१), चंद्रशेखर संभाजी पाटील यांची जेजू राष्ट्रीय विद्यापीठ, जेजू (जागतिक क्रमवारी १००१) आणि योगेश दादासो डांगे यांची गॅचोन विद्यापीठ, सेओंगनाम, दक्षिण कोरिया येथे भरघोस विद्यावेतनासह निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी बी.एस्सी. एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचा पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पूर्ण केलेला आहे.

जनसंपर्क कक्ष
25 AUG 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १७ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

## विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांच्या कॅम्पस मुलाखती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील केमिकल इंजिनिअरिंगमधील १७ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतींमधून विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील केमिकल इंजिनिअरिंग विभागाच्या बी.टेक. अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अधिविभागात कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते.

त्यातून बी.टेक. केमिकल अभियांत्रिकीच्या अंकेष चौगुले, ओंकार माने, वाल्मीक पाटील, सोहम भोले, सचिन कदम, दिव्या गव्हाणे, विद्युल्लता धर्मे, ऋतुजा खडके, समीक्षा मोरे, साईराज शिंदे, श्रेयस मिठारी, श्याम पाटील, वैष्णवी महाडिक, प्रीतम जामदार, पीयूष सिंग, अक्षय राठोड आणि प्रणव कदम या विद्यार्थ्यांची विविध



कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली आहे.

यामध्ये टीसीएस (पुणे), इन्फोसिस (पुणे), इंजिनेरो टेक्नालॉजीज (ठाणे), ब्लॅक अॅन्ड विच इंडिया लिमिटेड (पुणे), डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्टस् प्रा. लि. (पुणे), अल्काईल अमाइन्स केमिकल्स लि. (पुणे), विनवेज केमटेक (मुंबई) आणि ग्लेनमार्क लाईफ सायन्सेस प्रा. लि. (सोलापूर) या केमिकल क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना कुलगुरू दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव विलास शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक पी. डी. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे, जे. डी. पाटील तसेच शिवाजी विद्यापीठाचे सेंट्रल ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशीनकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच केमिकल इंजिनिअरिंग अधिविभागातील डी. एम. नांगरे, एस. एम. गायकवाड, ए. बी. मडावी, पी. पी. पाटील, डॉ. आर. पी. कलनके, व्ही. एस. मोहिते आणि एस. पी. देहनकर यांनी परिश्रम घेतले.

लोकसत्ता

# डॉ. होमी भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. रजनीश कामत

लोकसत्ता प्रतिनिधी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रजनीश कमलाकर कामत यांची मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी पाच वर्षांच्या कालावधीसाठी ही नियुक्ती घोषित केली.

डॉ. आर. के. तथा रजनीश कामत यांनी गेल्या २५ वर्षांत गोवा विद्यापीठ, पणजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ येथे उच्चशिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन लिन्केजिसचे संचालक, तंत्रज्ञान विभागाचे संचालक, इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणकशास्त्र अधिविभागांचे प्रमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करियर कौन्सिलिंग कक्षाचे समन्वयक आदी पदांवर त्यांनी काम केले.

डॉ. कामत यांचे दीडशेहून अधिक शोधनिबंध, १६ पुस्तके असे विपुल लेखन केले आहे. पंडित मदन मोहन मालवीय या योजनेअंतर्गत सायबर सुरक्षा केंद्राची स्थापना करण्याच्या कामी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. गेल्या पाच वर्षांत त्यांना १० कोटी रुपयांचे संशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यांनी महाराष्ट्रात परीक्षा सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राजेश अग्रवाल समितीवर तसेच महाराष्ट्र शासनाच्या राज्य गुणवत्ता परिषदेवरही काम केले आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे.

सकाळ

# 'सीड गणेशा' प्रतिकृती आज विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २४ : गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागात पर्यावरणपूरक 'सीड गणेशा' प्रतिकृती कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा गुरुवारी (ता.२५) दुपारी ३ ते ५ दरम्यान होणार आहे. अविघटनशील प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तींचे अनेक दुष्परिणाम आहेत. मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती जास्त निसर्गपूरक असतात. कार्यशाळेदरम्यान गणेशमूर्ती तयार करताना त्याच मातीत आपल्याला हव्या फुलझाडांच्या बिया रुजविल्या जातील. तयार केलेल्या मूर्तींचे गणेशउत्सवात पूजन होईल, गणेश विसर्जनाच्या दिवसापासून मूर्तीला पाणी घातले जाईल आणि थोड्या दिवसात त्या मातीतून तुमची आवडती फुलझाडे येतील. या संकल्पनेवर आधारित ही कार्यशाळा आहे. या कार्यशाळेसाठी कलानिकेतन महाविद्यालय येथील टेराकोटा तज्ज्ञ गौरव काइंगाडे हे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. साधारणतः १ किलो मातीपासून ३ ते ४ लहान आकाराच्या गणेशमूर्ती तयार करता येतात. हा उपक्रम सर्वांसाठी खुला आहे. अशी माहिती पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी दिली.



तरुण भारत

# विद्यापीठात आज 'सीड' गणेश प्रतिकृती कार्यशाळा

**कोल्हापूर :** गणेश उत्सवाच्या आगमनानिमित्य शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागामध्ये पर्यावरणपूरक 'सीड' गणेश प्रतीकृती कार्यशाळेचे आयोजन गुरुवारी (दि. २५ ) दुपारी ३ वाजता केले आहे. गणेशमूर्ती तयार करताना त्याच मातीमध्ये आपल्याला हव्या फुलझाडांच्या बिया रुजविल्या जातील. तयार केलेल्या मूर्तीचे गणेश उत्सवात पूजन होईल, गणेशविसर्जनाच्या दिवसापासून मूर्तीला पाणी घातले जाईल आणि थोड्या दिवसात त्या मातीतून तुमची आवडती फुलझाडे येतील. या संकल्पनेवर आधारित ही कार्यशाळा असणार आहे. कलानिकेतन महाविद्यालयातील गौरव काईगडे टेराकोटा तज्ज्ञ विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

तरुण भारत

# व्यवस्थापन समितीची मुदत ३१ ऑगस्टला संपणार

**शिवाजी विद्यापीठात मंगळवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अनेक प्रशासकीय निर्णय**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपणार आहे. त्यामुळे मंगळवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्रशासकीय, शैक्षणिक पातळीवरील अनेक निर्णय घेण्यात आले. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेने क्रीडा, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक चांगले निर्णय घेतले. नॅकचे ए मानांकन, एनआरएफ मानांकन आणि जागतिक पातळीवरील संशोधकांच्या यादीत ४८ प्राध्यापक आहेत. संशोधक विद्यार्थीनी, खेळाडू परदेशी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्याचा निर्णय घेतला. संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना शिष्यवृत्ती, कोरोना कालावधीत आई किंवा वडील गमावलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे अनेक विद्यार्थी हिताचे निर्णय घेतले आहेत. यासह प्रशासकीय पातळीवरील निर्णयही स्वागतार्ह आहेत. अनेक विषयावर व्यवस्थापन परिषदेत चर्चा झाली. तसेच महत्वाचे प्रशाकीय निर्णय मान्य करून विद्यापीठ प्रशासनाला या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा मार्ग रिकामा केला.

तरूण भारत

# पेपर फुटी प्रकरण; शिपाई, लॅब ॲसिस्टंट बडतर्फ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा बीएससी फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर फुटल्याचा प्रकार भरारी पथकाच्या निदर्शनास आल्याने हा पेपर रद्द केला. दोषी शिपाई व लॅब ॲसिस्टंट, प्राचार्य तसेच प्राध्यापकांची सुनावणी परीक्षा प्रमाद समितीसमोर झाली. चौकशीअंती शिपाई व लॅब ॲसिस्टंट यांना बडतर्फ केले. तर संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बदलले असून त्या महाविद्यालयाला एक लाख रुपयाचा दंड करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सूत्राने दिली.

पुढारी

# बी.एस्सी. फिजिकल केमिस्ट्री पेपरफुटीप्रकरणी दोघे बडतर्फ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा बी.एस्सी. (सीबीसीएस) भाग-३ चा फिजिकल केमिस्ट्री विषयाचा पेपर फुटल्याप्रकरणी संबंधित महाविद्यालयाचा लॅब असिस्टंट व शिपायाला बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच संबंधित महाविद्यालयास एक लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील परीक्षा केंद्रावर हा पेपर फुटला होता.

विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा १९ जूनपासून सुरू आहेत. कुंडल येथील एका परीक्षा केंद्रावर २३ जुलै रोजी बी.एस्सी. (सीबीसीएस) भाग-३ सत्र-६ फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच काही विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर व्हायरल झाल्याचे विद्यापीठाच्या भरारी पथकास निदर्शनास आले.

भरारी पथकाने तातडीने ही गोष्ट विद्यापीठ प्रशासनास कळविली. त्यानंतर तत्काळ त्या विषयाचा पेपर रद्द करण्यात आला होता.

25 AUG 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल शुल्क धोरण : सावधानता आवश्यक

**डिजिटल व्यवहार शुल्क वाढले, तर पुन्हा 'रोकड' व्यवहार वाढतील व त्यासाठी 'चलन' छपाई खर्च वाढेल, हेही लक्षात घेणे आवश्यक ठरते. आपलेच पैसे आपण वापरण्यास पुन्हा शुल्क देणे, हे केवळ अतार्किकच नव्हे, तर अव्यवहारी ठरते.**

रिझर्व्ह बँकेने डिजिटल पेमेंट शुल्क आकारणी व पद्धती याबाबत चर्चेसाठी मसुदा प्रसिद्ध केला असून त्याबाबत ई-मेलद्वारे ३ ऑक्टोबर २०२२ पर्यंत प्रतिक्रिया मागवल्या आहेत. प्रस्तावित बदल हे डिजिटल पेमेंट वापरणारे व्यापारी, ग्राहक तसेच ऑनलाईन पेमेंट वापरकर्ते यांच्यावर परिणाम करणारे आहेत. एकूण ४० प्रश्नांवर प्रतिक्रिया मागवल्या असून याबाबत अद्याप रिझर्व्ह बँकेने कोणतीही भूमिका ठरवलेली नसून, सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यावर धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे. त्यासाठी डिजिटल पेमेंट शुल्क पद्धतीतील बदल व त्याचे परिणाम समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

**डिजिटल पेमेंट पद्धत : स्वीकार व विस्तार**

रोख रक्कम देऊन व्यवहार पूर्तता करण्याची पारंपरिक पद्धत नव्या डिजिटल पेमेंटने जवळपास कालबाह्य ठरवली असून सुरक्षित, वेगवान, कमी खर्चिक पद्धत म्हणून तिचा स्वीकार वाढत आहे. अर्थव्यवहाराची गती वाढणे, सुरक्षितता वाढणे व तिचा वापर खर्च मर्यादीत असणे हे आर्थिक विकासास पोषक पूरक असते. क्युआर कोड वापरून अगदी १० रुपयांचे व्यवहार सर्वसामान्य ग्राहक आपल्या मोबाईलच्या साह्याने पूर्ण करेल. डिजिटल पेमेंट एनईएफटी, आरटीजीएस, यूपीआय, क्रेडिट व डेबिट कार्ड, रूपे यासारख्या साधनांचा वापर करीत व्यवहार पूर्ततेत एक क्रांतिकारक बदल झाला आहे. ही व्यवस्था कार्यक्षम, तंत्र-प्रगत व पुरेशी ठेवण्यासाठी जी गुंतवणूक करावी लागते त्याचा खर्च भरून येईल अशी व्यवस्था न केल्यास ती भविष्यकाळात अडचणीतच येणार, हे स्पष्ट आहे; पण त्याचबरोबर त्याचे शुल्क मर्यादीत असणे, वित्तव्यवहार सर्वांना सोयीस्कर ठरण्यास आवश्यक ठरते. डिजिटल पेमेंट धोरणासाठी रिझर्व्ह बँक या भूमिकेतून सूचना मागवत आहे. कोरोनाचा परिणाम म्हणून 'कॅशलेस' पद्धत विस्तारली व त्याबाबत रिझर्व्ह बँकेने अल्पशुल्क धोरण ठेवून प्रोत्साहित केले. सध्या डेबिट कार्डधारक ९२ कोटी, क्रेडिट कार्डधारक ७.५ कोटी असून यूपीआय, आयएमपीएस याचा वापर वेगाने वाढत आहे. रोख रक्कम न वापरता केवळ मोबाईल मार्फत होणारे व्यवहार ही नवी 'अर्थक्रांती' मोठी लाभकारी ठरली आहे. डिजिटल पेमेंट हे पैसे पाठविणे, स्वीकारणे याबरोबरच वस्तू व सेवा यांची खरेदी यासाठी वापरले जाते. यातील आरटीजीएस, एनईएफटी वगैरे निधी हस्तांतरणासाठी असून ते व्यक्ती ते व्यक्ती (P2P) असते ते व्यवसाय देणी म्हणजे वस्तू खरेदी-विक्रीमध्ये व्यक्ती ते व्यापारी (P2M-Person to Merchant) असा व्यवहार असतो. क्रेडिट व डेबीट कार्ड व तत्सम साधने याचा वापर येथे होतो. यातील निधी हस्तांतरणाच्या आरटीजीएस व एनईएफटी हे रिझर्व्ह बँक नियंत्रित करते, तर उर्वरित सर्व हे नॅशनल पेमेंटस् कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) याच्या अखत्यारीत येते.




जरी आर्थिक व्यवहार वेगाने, सुरक्षित होत असले, तरी त्यामागे मोठी यंत्रणा व सुविधा कार्यरत असते. सेवा देणारे व घेणारे यांच्यातील दुवा साधणारी यंत्रणा कार्ड पेमेंट नेटवर्क, घाऊक व किरकोळ व्यापारी व असंख्य ग्राहक यांचे जाळे कार्यरत असते. कार्ड पेमेंटचे बँकेशी व ग्राहकाशी संपर्क आणि व्यवहार पूर्ण करणारी यंत्रणा एमडीआर किंवा (Merchant Discount Rate) व्यापार सवलत दर वापरते. पैसे पाठवणारे अथवा स्वीकारणारे व्यवहार शुल्क देतात. हे शुल्क कार्ड वापरून १ टक्के होते. ते आता २०१६ पासून अर्धा टक्का आहे, तर पैसे पाठवण्याचे दरदेखील अल्प आहेत. सुविधा शुल्क (Coverinence Fee) ही सिनेमा तिकिटे, प्रवासाचे तिकीटं यावर आकारले जाते. तिकीट काढण्यासाठी द्यावा लागणारा वेळ व त्रास वाचतो. यासाठी सुविधा शुल्क आकारले जाते. याव्यतिरिक्त कोणत्या मार्गे पैसे दिले जातात त्यावर अधिभार आकारला जातो. ही सर्व शुल्क रचना पारदर्शी असणे, ग्राहकाला त्याची कल्पना देणे याबाबतही रिझर्व्ह बँक आग्रही आहे.

**शुल्क पुनर्रचना**

डिजिटल सेवांचा खर्च वसूल व्हावा व या आर्थिक सेवा गुणवत्तेने देता याव्यात, दीर्घकाळ सक्षम असाव्यात हा दृष्टिकोन जसा महत्त्वाचा आहे, तसेच व्यापक आर्थिक हिताचा, ग्राहकांची सोय याही बाबी महत्त्वाच्या ठरतात. शुल्क आकारणी बाजारतंत्री म्हणजे मागणी-पुरवठ्यानुसार असावी, हे शुद्ध तत्त्व दीर्घकाळ योग्य ठरते. तथापि, या सर्व विवेचनात ग्राहक जी अप्रत्यक्ष किंमत व प्रत्यक्ष शुल्क देतो यांचा एकत्रित विचार केलेला दिसत नाही. सर्वच बँका आता डिजिटल होत असून त्यांचा मनुष्यबळ खर्च प्रचंड धरला आहे, हे लक्षात घेता केवळ डिजिटल व्यवस्था खर्च ग्राहकांच्या माथी मारणे सयुक्तिक ठरत नाही. त्याच्याकडून 'ठेव स्वरूपात' खात्यावर जी किमान रक्कम असते त्याचे नेमके लाभ पारदर्शी होणे आवश्यक आहे. डिजिटल व्यवहार शुल्क वाढले, तर पुन्हा 'रोकड' व्यवहार वाढतील व त्यासाठी 'चलन' छपाई खर्च वाढेल, हेही लक्षात घेणे आवश्यक ठरते. आपलेच पैसे आपण वापरण्यास पुन्हा शुल्क देणे हे केवळ अतार्किकच नव्हे, तर अव्यवहारी ठरते. डिजिटल व्यवहार अर्थव्यवस्था अधिक स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. कारण, खर्च व्यवहार नोंदवले जातात. काळा पैसा, समांतर अर्थव्यवस्था नियंत्रित करण्यात होणारा फायदा हाही शुल्क आकारणी ठरवताना झाला पाहिजे. वित्तीय समावेशकता आजही ५६ टक्के एवढीच असून डिजिटल पेमेंट हे महत्त्वाचे शस्त्र यासाठी उपयुक्त आहे. शुल्कवाढीच्या अल्पकालीन लाभासाठी वरील सर्व ग्राहक खर्च व सामाजिक लाभ विचारात घेता अजूनही शुल्क वाढीऐवजी व्यवहारवाढीतून उत्पन्नवाढीचा मार्ग स्वीकारणे व काही प्रमाणात छोटे व्यापारी, ग्राहक यांना प्रचलित सवलती, सुविधा विस्तारणे डिजिटल विस्तारास आवश्यक आहे, अन्यथा पुन्हा उलटा प्रवास सुरू होण्याचा धोका आहे.

**- प्रा. डॉ. विजय काकडे**